# REVIEW OF RESEARCH

UGC APPROVED

International Online Multidisciplinary Journal


ISSN 2249-894X

Impact Factor 5.7631 (UIF)

# Historiography and Trends in History

## Special Issue

February, 2019



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.


| | | |
|---|---|---|
| 13 | डॉ. आंबेडकरांचा राष्ट्रवाद, लोकशाही आणि राज्यसमाजवाद<br>प्रा. आशिष आनंद रजपूत | 55 |
| 14 | इतिहास लेखनातील नवविचार प्रवाह – वंचितांचा इतिहास<br>Dr. Sunil S. Rajput | 58 |
| 15 | महाराष्ट्रातील इतिहास लेखनावर स्त्रीवादी विचारांचा प्रभाव<br>Shejul Bappasaheb Ramling | 61 |
| 16 | स्थानिक इतिहासलेखन : श्री क्षेत्र धुळदेव<br>प्रा. डॉ. संतोष तुकाराम कदम | 65 |
| 17 | मार्क्सवादी तत्त्वज्ञानाचा भारतीय इतिहास लेखनावरील प्रभाव<br>Thorat Mahadeo Shamrao | 68 |
| 18 | छत्रपती संभाजी महाराज इंग्रज यांच्यातील राजकीय खलबते<br>प्रा.डॉ.भारत जाधव | 72 |
| 19 | सबाल्टर्न इतिहास लेखन प्रवाह<br>प्रा. सौ. कापशीकर धनश्री रामचंद्र | 75 |
| 20 | Aptitude Of A Research: Qualities Of A Research Student<br>Dr. Mane Vivekanand Pandurang | 78 |
| 21 | वंचितांचा इतिहास<br>प्रा. घाडगे आर. व्हि. | 80 |
| 22 | कार्ल मार्क्स आणि समाजवाद विचारसरणी<br>प्रा. युवराज गुंडू सुरवसे | 83 |
| 23 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महिला सबलीकरण<br>प्रा. मिलिंद व्यंकटी घाडगे, | 85 |
| 24 | Micro Level Planning For Primary Health Care Centers In Osmanabad District (MS)<br>Dr. Kale Vijay. Prakash | 88 |
| 25 | आधुनिक महाराष्ट्रातील स्त्री जागृती आणि दलित जागृतीचे सुधारक गोपाळ गणेश आगरकर :<br>प्रा. सुमन केंद्रे | 95 |
| 26 | गांधी तत्त्वज्ञानाचे अनुयायी : स्वातंत्र्यसैनिक रघुनाथ रामचंद्र माने गुरुजी यांचे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील कार्य<br>प्रा.डॉ. दत्तात्रय गोरख मगर | 99 |


Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad

REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)

# इतिहास लेखनातील नवविचार प्रवाह – वंचितांचा इतिहास

Dr. Sunil S. Rajput
Jawahar Mahavidyalaya, Andur, Tal – Tuljapur, Dist : Osmanabad.




### ❖प्रस्तावना :–

इतिहास लेखनाच्या आधुनिक विचार प्रवाहांपैकी एक विचार प्रवाह म्हणून उपेक्षीत, वंचित इतिहासाचा शोध आहे. भारतात विसाव्या शतकाच्या अखेरच्या वीस वर्षात सबाल्र्टन इतिहास प्रवाहाने इतिहास लेखनासाठी नवी दारे खुली केली, व भारतीय इतिहास लेखनाला नवी दिशा देऊन नव्या पर्वाला सुरुवात झाली. इतिहासात ज्या घटना, घडल्या त्या घटनांच्या मागे नेतृत्व करणारा एखादा पुरूष असतो, तर ती घटना घडविण्यामागे सर्वसामान्य व्यक्ति व स्त्रीया यांचाही सहभाग असतो, योगदान असते. त्याच्या योगदानाचा शोध वंचितांच्या (सबाल्टर्न) इतिहासात अभ्यासला जातो. अशा या वंचितांच्या इतिहास लेखनाचा दृष्टीकोन युरोपातील इंग्लंड या राष्ट्रात उदयाला आला.

"इतिहास म्हणजे वर्तमानकाळ व भूतकाळ यामधील कधीही न संपणारा संवाद होय". इ.एच.कार यांच्या या मताचा धागा पकडून असे म्हणता येईल की, इतिहास संशोधन आणि लेखन सातत्याने चालू राहणारी प्रकिया आहे. प्राचीन काळापासून इतिहास लेखनाची ही परंपरा अखंडीतपणे चालू आहे. या लेखन परंपरेने अनेक वळणे घेत नवनवीन विचार प्रवाह निर्माण केले. त्यापैकी इतिहास लेखनातील एक नव प्रवाह म्हणजे उपेक्षीत, वंचितांचा इतिहास होय.

### ❖वंचित (सबाल्टर्न) संकल्पनेचा उदय, अर्थ व स्वरूप :–

विसाव्या शतकाच्या अखेरच्या वीस वर्षात भारतात सबाल्टर्न ही संकल्पना आलेली असली तरी या संकल्पनेचा उदय हा पाश्चात्य देशात 19 व्या शतकाच्या शेवटच्या दशकात आणि 20 व्या शतकाच्या पूर्वार्धात झालेला आहे. अन्तोनिओ ग्रामची या मार्क्सवादी विचाराने प्रभावीत असणा–या अभ्यासकाने भावी इतिहासकारांना आवाहन केले की, त्यांनी भूतकाळाची माहिती रेखाटताना असंख्य आव्हाने स्वीकारली पाहिजेत. ही आव्हाने फक्त स्विकारून चालणार नाहीत तर, समाजातील घडलेल्या घटनांबरोबरच समाजामध्ये दबलेला, दडलेला दुसरा गट असतो. त्यास दुय्यम गट म्हणजेच सर्वसामान्य व्यक्ति किंवा माणूस यांच्या योगदानाचा मार्ग काढला पाहिजे. या त्यांच्या विचारांमुळेच वंचित (सबाल्टर्न) संकल्पनेचा उदय झाला.

वंचित, उपेक्षीत, शोषित गटांचा इतिहास म्हणजे केवळ त्यांच्या कार्याचा व कृतीचा इतिहास नव्हे तर त्या कृतीमागील त्यांची मानसिकता, त्यांच्या जीवन पध्दती, जीवनमूल्य, अनुभवजन्य शहाणपण यांचाही विचार निकडीचा आहे. कारण त्याशिवाय त्यांच्या कार्याचे मर्म उलगडणार नाही.



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

गतकाळातल्या ऐतिहासिक घटनांच्या नोंदी ठेवताना समाजाच्या वरच्या स्तरावरील अभिजन वर्गाने आपल्या अभिजनवादी मानसिकतेने समाजातल्या सामान्य, दुर्लक्षीत, तळागाळातल्या दलित दीनदुबळ्या घटकाच्या नोंदी टाळून त्यांना वंचित ठेवले होते. समाजातील वंचित हे वंचित का आहेत याचा कधी गांभीर्याने विचारच अभिजनवादी मानसिकतेने केला नव्हता. आता वंचितांविषयीच्या नव्या जाणीवा निर्माण होऊ लागल्यापासून हा विचार होऊ लागला आहे.

**❖इतिहासात गौण घटक व सैनिकांचा शोध : –**

इतिहासाचा अभ्यास हा वरच्या स्तरातून साकारलेला दिसतो. त्यामुळेच आपणास प्रभावी घटकाची वाटचाल लक्षात येते. उदा. युंध्दात सेनापतीची नोंद होते. राजा व सेनापतीचा गाजावाजा होतो. यशाचे खरे मालक हे राजे व सेनापती होतात. परंतू प्रत्यक्षात लढणा–या पराकमी सैनिकांचा मात्र उल्लेख नसतो. लढाईत जसे सेनापतीचे नेतृत्व, त्याचे डावपेच महत्वाचे असतात तितकेच किंवा त्याही पेक्षा जास्त सैनिकाचे गौण गटाचे पराकम व त्याची कडवी झुंज महत्वाची असते. इतिहासकारांनी या नेमक्या कार्याची दखल घेतली नाही. यात गौण सैनिकालाच वगळण्यात आले किंवा दुर्लक्षीत केले, अशी भावना निर्माण झाली. म्हणून सामान्यांच्या इतिहासाचा शोध घेण्याविषयीचा विचार आधुनिक जगात पुढे आला.

**❖इतिहासाचा खरा निर्माता –सामान्य गट :–**

सामान्य गट हाच इतिहासाचा खरा निर्माता आहे, असे प्रसिध्द भारतीय इतिहास लेखनकार डॉ.रणजीत गुहा हे निर्भीडपणे आपले मत मांडताना म्हणतात की, त्यांच्या कार्याचे श्रेय त्यांना दिले पाहिजे. गरीब मजूर हाच स्वतःचा इतिहास निर्माता असतो. या दृष्टीने असे म्हणता येईल की, गरीब शेतकरी , मजूर, गुराखी इ.सबाल्टर्न विचारानूसार इतिहासाचा खरा मानकरी आहे. जर या वर्गाला डावलून जगातील कोणत्याही राष्ट्राचा इतिहास लिहला गेला तर तो लिहलेला इतिहास अपूर्णच असेल. डॉ.रणजीत गुहांच्या मते इतिहास लिहताना अभिजन व विभाजन असे दोन गट करून कनिष्ठ गटाच्या ऐतिहासिक वाटचालींचा विचार केला जावा. त्यांना दोन भिन्न गटात टाकून अभ्यास व्हावा. तसेच त्याचे परस्पर संबंध स्पष्ट केले जावेत. इतिहासात सामान्यांचा इतिहास स्पष्ट व्हावा मग तो भारताचा किंवा जगातील इतर कुठल्याही राष्ट्राचा इतिहास असो.

**❖निष्कर्ष :.**

1) वंचित (सबाल्टर्न) हा इतिहास लेखन प्रवाह इतिहासाच्या क्षेत्रातील एक अभिनव प्रयोग आहे.
2) वंचित इतिहास लेखन प्रवाहाने दुर्लक्षीत समाज गटांना इतिहासात स्थान मिळवून दिले.
3) वंचित इतिहास लेखन प्रवाहाने दुर्लक्षीत राहिलेली धूळ, जमलेली गैर परंपरागत साधने प्रकाशात आणली आहेत.
4) या इतिहास लेखन प्रवाहाने आर्थिक स्तराशिवाय इतर विचार स्तरावरील सत्ता गाजविणारा व त्यांचा अंकित गट यांचे परस्पर विश्लेषण करून इतिहास लेखनाला नवे वळण दिले आहे.
5) वंचित इतिहास लेखन प्रवाहाने आजवर दुर्लक्षीत राहिलेल्या विषयांकडे अभ्यासकांचे लक्ष आकर्षित केले आहे.

**❖समारोप –**

वंचित (सबाल्टर्न) विचार प्रवाहामधून भारतीय इतिहासाच्या मांडणीला एक नवीन वळण मिळाले. समाजातील ज्या गटाने, वर्गाने, समूहाने इतिहास घडविला, असा जो उपेक्षीत वर्ग इतिहास लेखनाच्या प्रवाहापासून दूर होता, त्याला इतिहास लेखन प्रवाहात आणण्याचे व न्याय देण्याचे महत्वाचे काम सबाल्टर्नच्या माध्यमातून होत आहे. परंतू अद्यापही हे काम अपूर्णच आहे.

एकूणच आजच्या समाजाशी, लोकांच्या राजकारणाशी सबाल्टर्न स्टडी कशाप्रकारे जोडता येईल याचा अभ्यास, विचार झाला तर ख–या अर्थाने वंचितांचे , उपेक्षितांचे लिखाण लोकाभिमुख होईल.

**❖संदर्भ सूची –**

1) सबल्टर्न स्टडीज परिचयात्मक टिपण – डॉ.उमेश बगाडे

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

2) इतिहासाचे तत्वज्ञान – डॉ.एस.एस.गाठाळ, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगपुरा, औरंगाबाद
3) चव्हाण प्रविण, सबाल्टर्न इतिहास लेखन मुक्तीगीत ? नव्हे शोकात्मिका, साधना दिवाळी अंक, पुणे 2006
4) डॉ.कोठेकर शांता, इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, श्री साईनाथ प्रकाशन , नगापूर
5) डॉ.देव प्रभाकर : इतिहास एक शास्त्र, कल्पना प्रकाशन, नांदेड
6) डॉ.बगाडे उमेश : महाराष्ट्रातील प्रबोधन आणि वर्गजातीप्रभुत्व, सुगावा प्रकाशन , पुणे. प्रथम आवृत्ती 26 जुलै 2006
7) डॉ.सरला धारणकर – इतिहासाचा अभ्यास आणि संशोधन
8) ई.एच.कार : इतिहास म्हणजे काय ? कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, प्र.आ.1994, अनु. प्रा.वि.गो.लेले.



Principal
Jawahar Arts, Science & Commer...
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Os...